दैनिक
# विवेक सिंधु

बीड जिल्हा | रविवार, दि.20 सप्टेंबर 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 46 वे | अंक क्र.147 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www. viveksindhu.com

## अल्पवयीन मुलीची पाठलाग करीत छेडछाड




केज – एका अल्पवयीन मुलीची एका तरुणाने सहा महिन्या पासून पाठलाग करीत छेडछाड केली. तर दुसऱ्याने दबाव टाकून धमकी दिल्याची घटना केज शहरात घडली. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

केज शहरातील एका भागातील १४ वर्षे ३ महिने २८ दिवस वयाची मुलगी ही शाळेत आणि ट्युशनसाठी जात असताना प्रवीण रोहिदास गाढवे (रा. उमरी रोड, केज) याने तिचा सहा महिन्यांपासून पाठलाग करीत छेडछाड करीत होता. तर १७ सप्टेंबर रोजी रात्री ९.१० वाजेच्या सुमारास शाहु बँकेच्या गेट समोर कानडी रोडवर व त्यानंतर १० वाजता उमरी रोडवर या मुलीस आडवून प्रवीण गाढवे याने, "तु माझ्या सोबत बोलत का नाहीस ?, माझ्या गाडीवर बस." असे म्हणत ओढणी ओढुन "जा माझ्या बद्दल कोणाला काय सांगायचेय ते सांग." असे म्हणाला. तर बाळासाहेब गाढवे याने या मुलीस तु खोटं बोलत आहेस, खरे काय आहे, ते सांग. खोट निघाले तर तुला मी सोडणार नाही." असे म्हणत दबाव टाकून धमकी दिली. अशी तक्रार मुलीच्या आईने दिल्या वरुन प्रवीण गाढवे, बाळासाहेब गाढवे या दोघांविरुद्ध कलम ७४, ७८, ३५१ (२), ३ (५) बीएनएस व सहकलम ११, १२ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे. पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक राकेश नेटके हे पुढील तपास करीत आहेत.

# केज मतदारसंघात ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी

### चुकीच्या पर्जन्य नोंदींमुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती

अंबाजोगाई – केंद्र शासनाच्या 'विंड्स' (WINDS) प्रकल्पांतर्गत मंजूर झालेली स्वयंचलित हवामान केंद्रे (AWS) केज विधानसभा मतदारसंघातील गावांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर तातडीने बसवून कार्यान्वित करावीत, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. महसूल मंडळ स्तरावरील एकाच केंद्रावर अवलंबून राहिल्याने पर्जन्यमानाची अचूक नोंद होत नसून, याचा थेट फटका दुष्काळी मदत, नुकसानभरपाई आणि पीक विम्याच्या लाभावर बसण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

राज्य शासनाने केंद्र सरकारच्या 'वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टीम' (WINDS) प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत पातळीवर स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतलेला आहे.



या निर्णयानुसार केज विधानसभा मतदारसंघातील केज, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायतींमध्ये जागांची निवड करून मंजुरीसाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत. मात्र, जागांची निश्चिती आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊनही अद्याप प्रत्यक्ष ठिकाणी ही केंद्रे उभारण्यात आलेली नाहीत. परिणामी, ग्रामपातळीपर्यंत हवामानविषयक अचूक माहिती मिळवण्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

सध्या पर्जन्यमानाची नोंद खासगी संस्थेमार्फत केवळ महसुली मंडळ स्तरावरील केंद्रांवरून घेतली जात आहे. यंदा पावसाचे वितरण अत्यंत असमान स्वरूपाचे दिसून येत आहे. महसूल

▸ पान 3 वर

# दुष्काळी तालुक्यांच्या यादीतून अंबाजोगाई तालुका वगळल्याची पसरली अफवा

### अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवण्याचे कृषी विभागाचे आवाहन

अंबाजोगाईः तालुक्याला दुष्काळातून वगळण्यात आल्याची एक बोगस यादी सध्या सोशल मीडियावर आणि व्हॉट्सअपवर वेगाने व्हायरल होत आहे. या खोट्या माहितीमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाकडून अद्याप अशी कोणतीही अधिकृत यादी जाहीर करण्यात आली नसल्याचा स्पष्ट खुलासा अंबाजोगाईच्या तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केला आहे.

मागील काही दिवसांपासून व्हॉट्सअप आणि इतर समाजमाध्यमांवर एक यादी फिरत आहे. या यादीचा संदर्भ देत अंबाजोगाई तालुका दुष्काळी अनुदानातून किंवा दुष्काळातून वगळण्यात आल्याचे दावे केले जात आहेत. अशा प्रकारच्या बिनबुडाच्या बातम्यांमुळे आधीच संकटात असलेल्या बळीराजाची मोठी दिशाभूल होत आहे. कुठलीही शहानिशा न करता नागरिक या याद्या पुढे पाठवत असल्याने अफवांना मोठे पीक आले आहे.

या वाढत्या अफवांची गंभीर दखल घेत अंबाजोगाई तालुका कृषी कार्यालयाने खुलासा करत या सर्व वावड्या फेटाळून लावल्या आहेत. शासनाने अंबाजोगाई तालुका दुष्काळग्रस्त असल्याबाबत किंवा त्याला वगळण्यात आल्याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. शासन स्तरावरून अधिकृत दुष्काळ यादी किंवा आदेश

▸ पान 3 वर

## कानडीमाळी येथे दोन तरुणांचे लोखंडी रॉडने डोके फोडले

केज :- क्षुल्लक कारणा वरून दोन तरुणांना लोखंडी रॉडने मारहाण करीत दोघांचे डोके फोडल्याची घटना कानडीमाळी ता. केज येथे घडली.

केज शहरातील क्रांतीनगर भागातील सुमित संजय लोखंडे याने त्याचा मित्र आदित्य डोंगरे यास फोन वरून विनाकारण शिवीगाळ का केली ? अशी विचारणा केली असता त्यास प्रथमेश उर्फ बॉबी खाडे याने तुला काय करायचे ? असे म्हणत शिवीगाळ करीत चापट मारली. त्यास सुमित याने पण चापट मारली. त्यां नतर १७

▸ पान 3 वर

## स्व.भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्काराचे आज वितरण

### कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना डॉ. विश्वास पाटील यांच्या हस्ते प्रदान केला जाणार

अंबाजोगाई – यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा दरवर्षी दिला जाणारा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना आज सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख यांच्या उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आंबेजोगाई येथील राजकारणी, समाजकारण, साहित्य, संस्कृती, संगीत,शिक्षण आदी क्षेत्रात उतुंग कार्य केलेले



स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी साहित्य, संगीत, पत्रकारिता, सुसंस्कृत राजकारणी, क्रीडा, सिनेमा – नाट्य, शिक्षण आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या एका मान्यवरास हा पुरस्कार स्वर्गीय भगवानराव लोमटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जातो यावर्षी हा १४ वा पुरस्कार सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना दिला जाणार आहे.

त्यांच्या साहित्याने मराठी ग्रामीण साहित्याला एक वेगळी ओळख आणि नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या प्रसिद्ध “काया मातीत मातीत” या काव्यसंग्रहातील शीर्षकातूनच त्यांच्या काव्यविश्वाचे स्वरुप स्पष्ट होते. त्यांनी इंदौर येथे एम. ए. मराठी शिक्षण घेतले व संत गाडगे बाबा विद्यापीठ नागपूर येथून "पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास" याविषयात पी.एच.डी. प्राप्त झाली.

कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी, गावशिव, पंढरीच्या वाटेवर, काया मातीत मातीत, वैदर्भी, साय, वृषभसूक्त, मातीचा झरतो

▸ पान 3 वर

## गीता रोडवर अंबाजोगाई-तळेगाव एसटी बस पलटी होता होता बचावली


### » प्रवाशांचा जीव भांड्यात

अंबाजोगाई – अंबाजोगाईहून तळेगावला जाणारी एसटी बस आज सकाळी साडेआठ वाजता गीता रोडवर पलटी होता होता थोडक्यात बचावली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील सर्व प्रवासी सुखरूप असून एक मोठा अनर्थ टळला आहे.

आज सकाळच्या सुमारास प्रवाशांना घेऊन जाणारी ही बस गीता रोडवरून जात असताना अचानक कलंडली आणि पलटी होण्याची परिस्थिती निर्माण झाली. या अनपेक्षित घटनेमुळे बसमधील प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट उडाली होती. सुदैवाने, चालकाने वाहनावर वेळीच नियंत्रण मिळवल्याने बस सावरली आणि मोठा अपघात टळला.



या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणालाही दुखापत झालेली नाही. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. मात्र, या थरारक घटनेमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्त्यांची दुरवस्था आणि एसटी बसेसची देखभाल यावर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आता प्रवाशांकडून संतप्त भावनांसह व्यक्त केली जात आहे.



# विघ्नहर्ता श्री गणेशा

गणपती हे हिंदू धर्मातील दैवत आहे१ त्याची प्रतिमा संपूर्ण भारतभर आढळते.२ अनेक हिंदू संप्रदाय आपल्या संलग्नतेची पर्वा न करता या देवाची पूजा करतात. गणेशाची भक्ती मोठ्या प्रमाणावर पसरलेली आहे. जैन आणि बौद्ध धर्मांमध्येही तो पूजला जातो.३ जरी गणेशाचे अनेक गुणधर्म असले तरी तो त्याच्या हत्तीच्या डोक्याच्या आकारामुळे सहज ओळखला जातो.४ तो मोठ्या प्रमाणावर आदरणीय आहे, विशेषतः अडथळे दूर करणारा (विघ्नहर्ता) आणि नशीब आणणारा देव म्हणून तो ओळखला जातो. ५ ६ कला आणि विज्ञानाचा संरक्षक; तसेच बुद्धी आणि शहाणपणाचा देव म्हणून गणपती प्रसिद्ध आहे. ७ सुरुवातीसाठीचा देव म्हणून, त्याला संस्कार आणि समारंभाच्या सुरुवातीला सन्मानित केले जाते. लेखन सत्रादरम्यान अक्षरे आणि शिक्षणाचा संरक्षक म्हणून गणेशाचे आवाहन केले जाते. ८९ अनेक ग्रंथ त्याच्या जन्म आणि पराक्रमांशी संबंधित पौराणिक कथा सांगतात.



गणेशाचा उपासक संप्रदाय गाणपत्य नावाने ओळखला जातो.या संप्रदायाचा उगम पंधराव्या शतकात झाला असे मानले जाते.१० हा संप्रदाय गणेशाची मयूरेश्वर नावाने पूजा करतो. त्यांचा मुख्य मंत्र, गणेश गायत्री मंत्र असा आहे – एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दन्ती प्रचोदयात.११ आदी शंकराचार्यांनी गणपतीस पाच मुख्य देवतेत स्थान दिल्यावर गणपतीची दैवत म्हणून लोकप्रियता वाढू लागली. गणपतीच्या उपासकांचा गाणपत्य संप्रदाय निर्माण झाला.१२ पुण्याजवळच्या चिंचवडचे मोरया गोसावी हे गाणपत्य संप्रदायातील एक पुरुष मानले जातात. या संप्रदायात गणपतीवर दोन उपपुराणे रचिली गेली पुराणांमध्ये गणपती हा शिवहर, पार्वतीपुत्र या नावांनी व शंकरपार्वतींचा मुलगा असल्याचे सांगितले जाते. पुराण साहित्यात गणपतीचे अनेक ठिकाणी उल्लेख आहेत. पुराण साहित्यात गणपतीच्या विविध नावांचा उल्लेख आहे.१५ महाभारत या ग्रंथाचा लेखनिक होता.गणेश शब्दाचा अर्थ गणांचा ईश वा प्रभू असा आहे. गण म्हणजे शिव व पार्वतीचे सेवक होय. गणांचा अधिपति म्हणून गणपती असेही नाव या देवतेस आहे.१७ विनायक हे नाव दक्षिणेत वापरतात. हे नाव 'गणपती' नावाशी संबंधित आहे. विनायक या शब्दाचा अर्थ वि म्हणजे विशिष्टरूपाने जो नायक (नेता) आहे तो.१८ याच अर्थाने गणाधिपती नावही प्रचलित आहे. हेरंब म्हणजे दीनजनांचा तारणकर्ता होय.१९

वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, विकट आणि लंबोदर ही गणपतीची देहविशेष दर्शविणारी नावे आहेत.२० गणपतीला इतर काही नावे आहेत त्यांचे अर्थ असे वक्रतुंड म्हणजे ज्याचे तुण्ड (तोंड) वक्र वा वाकडे आहे तो.२१ गणपतीच्या सोंडेमुळे चेहरा थोडासा वक्र दिसतो त्यामुळे हे नाव. एकदंत म्हणजे ज्याला एक दात आहे तो. गणपतीस एक दात असण्याच्या अनेक पौराणिक कथा सांगितल्या जातात. प्रथम कथेनुसार, परशुरामाने युद्धात गणपतीचा एक दात उपटला. दुसऱ्या कथेनुसार कैलास पर्वतावर गणपतीने रावणास अडवले म्हणून रावणाने गणपतीचा एक सुळा मोडला. संदर्भ हवा आणखी एका कथेनुसार खेळाखेळातील लढाईत कार्तिकेयाने गणपतीचा एक दात भग्न केला. महोदर आणि लंबोदर शब्दांचा अर्थ अनुक्रमे महा म्हणजे मोठे उदर (पोट) असणारा व लंब वा लांबडे उदर (पोट) असणारा असा आहे. ही दोन्ही नावे गणपतीचे स्थूलत्व दाखवतात. विघ्नराज वा विघ्नेश्वर शब्दाचा अर्थ सकल विघ्न वा बाधांचा अधिपति असा आहे. पुराणात सर्वत्र गणपतीचा विघ्नाधिपती म्हणून उल्लेख आढळतो. सकल बाधांचा अधिपति व नियंत्रक असल्यामुळे गणपतीस हे नाम प्राप्त झाले.२२१७

सध्या स्मिथसोनियन इन्स्टिट्यूटमध्ये असलेले व मूळचे इ.स. १३ व्या शतकातील म्हैसूर भागातील गणपतीचे पाषाणशिल्प वैदिक काळ – गणपतीचा प्रथम उल्लेख प्राचीनतम हिंदू धर्मग्रंथ असलेल्या ऋग्वेदात मिळतो. २३दोन ऋक मंत्र (गणानाम गणपतीम् हवामहे... २४ व विषु सीदा गणपते...२५) वैदिक गणपतीचा स्पष्टपणे निर्देश करतात. जरी हा वैदिक गणपती व सध्या पूजिला जाणारा पौराणिक गणपती एक नसला तरी वेदोत्तर काळात ऋग्वेदातील गणपती–ब्रह्मणस्पती–वाचस्पती पासूनच पौराणिक गजवदन–गणेश–विघ्नेश्वर हे रूप निर्माण झाल्याचे संशोधक मान्य करतात.२६

ऋग्वैदिक गणपतीची दुसरी नावे होती –बृहस्पती, वाचस्पती. ही देवता ज्योतिर्मय मानली जाई.२७ तिचा वर्ण लालसर सोनेरी होता. अंकुश, कुऱ्हाड ही या देवतेची अस्त्रे होती. या देवतेच्या आशीर्वादाशिवाय कोणतेही इष्टकाम संभव होणार नाही असे मानले जाई. ही देवता कायम 'गण' नामक एका नृत्यकारी दलासोबत विराजमान असे व देवतांची रक्षकही मानली जाई. दुसऱ्या मतानुसार भारतातील अनार्यांच्या हस्तिदेवता व लम्बोदर यक्षाच्या एकत्रीकरणातून गणेश संकल्पना निर्मिली गेली. गणेश या मूळच्या अनार्य देवतेचे आर्यीकरण झाले असावे हा दुसरा कयास लावण्यात येतो. गणेशाचे वाहन उंदिर याच आदिम संस्कृतीचे प्रतीक म्हणून राहिले असावे.२९ इसवीसनाच्या चौथ्या शतकातील कालिदास, इसवीसनाच्या सहाव्या शतकातील भारवी, इसवीसनाच्या पाचव्या शतकातील पंचतंत्र वा भरताच्या नाट्यशास्त्रातही गणेश देवता दिसत नाही. गुप्त काळापासूनच या देवतेची स्वतंत्र पूजा प्रचलित झाली असे अभ्यासक मानतात.३०

विनायक रूप– मानवगृह्यसूत्र व याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये शाल, कटंकट, उष्मित, कुष्माण्ड राजपुत्र व देवयजन इत्यादींचा विनायक म्हणून उल्लेख आहे. महाभारतातील विनायक हाच आहे. याचे काम विघ्न उत्पादन करणे असे.३१ पुढे हाच विघ्नकर्ता गणपती विघ्नहर्ता मानला जाऊ लागला.३२ याज्ञवल्क्य स्मृतीनुसार विनायक हा अम्बिकेचा पुत्र होय.२३ गणेशाचा पार्वतीपुत्र उल्लेख येथेच प्रथम होतो. कार्तिकेयाचे अनेक गण वा पार्षदही पशुपक्ष्यांचे मुखधारित असतात. इसवीसनाच्या सहाव्या शतकातील 'भूमारा'त याप्रकारच्या अनेक गणांचा उल्लेख सापडतो. गणेश म्हणजेच गण–ईशाचे हत्तीमुख असण्याचे हेही कारण असू शकते. काही ठिकाणी गणेश व यक्ष/नागदेवता यांची वर्णने मिसळल्याचे दिसते. गणपतीच्या हत्तीमुखाचे हेही कारण असावे. पुराणांमध्ये हत्तीमुखधारी यक्ष आहेत. यक्ष हे गणपती प्रमाणे लंबोदर असतात. याज्ञवल्क्य संहिता' या ग्रंथात विनायक व गणपतीच्या पूजेचे विवरण सापडते. इसवी सनाच्या सातव्या शतकात रचलेल्या ललित माधव ग्रंथात गणपतीचा उल्लेख आहे.गणेश ही पौराणिक हिंदू धर्मातील प्रथम पूज्य व त्या एक मुख्य देवता आहे. गणपती संप्रदायाने गणेश म्हणून व मुदगल या देवतेदोन पुराणे व महाकाव्यांत उल्लेखआहेत. गणेशाविषयीची सर्वाधिक महत्त्वाची आख्यायिकात अवस्थांतर होय.

गणेश पुराण व मुद्गल पुराण या ग्रंथाच्या रचनाकाळात मतभेद आहेत. यांची रचना साधारणपणे इ.स. ११०० ते इ.स. १४०० मध्ये झाल्याचे मानले जाते. सामान्यपणे गणेश पुराण हा आधीचाव मुद्गल पुराण नंतरचा ग्रंथ मानतात. गणपती अथर्वशीर्षाची रचना इसवीसनाच्या सोळा ते सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या काळात झाली.

## धानोरा येथे ४६ वे वाचन केंद्र सुरू, ५१ पुस्तकांचा संच

बीड – वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी वाचाल तर वाचाल या अभियानांतर्गत फिरते मोफत वाचानालयाचे ४६ वे वाचन केंद्र बीड तालुक्यातील धानोरा येथील एकलव्य नगर येथे सुरु करण्यात आले. या वाचान केंद्राचा उद्घाटन सोहळा बुधवार (१६ सप्टेंबर) रोजी पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभू पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संतोष बर्डे, प्रा. श्रीराम जाधव, सेवा निवृत्ती जिल्हा प्रबंधक एलआयसी, यु. एस. वाघमारे, प्रा. टी. जी. कांबळे, पोस्टमास्टर अमरसिंह ढाका, शिक्षक संतोष बर्डे, प्रतिभा रोडे, प्रकाश फाटक आदींची उपस्थित होते. विचारमंचावर आयुष्यमान काशिनाथ वाघमारे, संविधान युवा मंचचे अध्यक्ष ड. राजेश शिंदे, बीड विधानसभा मतदारसंघ बसपाचे अध्यक्ष रजनीकांत वाघमारे, निखिल वडमारे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन राजाभाऊ आठवले यांनी केले. 'वाचाल तर वाचाल'चे अध्यक्ष डी. जी. वानखेडे यांनी प्रास्ताविक केले. महामानव अभिवादन ग्रुपच्या समाजोपयोगी, प्रबोधनात्मक कामाचा आढावा मांडला. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन घेतले. प्रा. श्रीराम जाधव, प्रकाश फाटक, ड. राजेश शिंदे,अमरसिंह ढाका, संतोष बर्डे, डॉ. राजेंद्र भारुड आदींनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्रभू पवार यांनी वाचनाचे महत्व विशद केले. आभार प्रदर्शन काशिनाथ वाघमारे यांनी केले.

## योगेश्वरी सैनिकी स्कूलमध्ये शहीद स्मृती स्मारकाची उभारणी



अंबाजोगाई – देशाच्या सार्वभौमत्वाचे, स्वातंत्र्याचे आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी भारतीय सैनिक अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. मातृभूमीच्या रक्षणासाठी अनेक वीर जवानांनी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान दिले आहे. त्यांच्या त्यागाची, शौर्याची आणि राष्ट्रभक्तीची जाणीव पुढील पिढ्यांना व्हावी तसेच त्यांच्या कार्याला कायमस्वरूपी अभिवादन करता यावे, या उदात्त हेतूने योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी सैनिकी स्कूल, आंबाजोगाई येथे शहीद स्मृती स्मारकाची उभारणी करण्यात आली आहे.

याविषयी माहिती देताना प्राचार्य मेजर एस. पी. कुलकर्णी म्हणाले की, शहीद स्मारक हे केवळ दगड, धातू किंवा शिल्पाची वास्तू नसून ते राष्ट्राच्या कृतज्ञतेचे जिवंत प्रतीक आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृती चिरंतन जतन करण्यासाठी आणि त्यांच्या त्यागाला अभिवादन करण्यासाठी या स्मारकाची निर्मिती करण्यात आली आहे.

दररोज शाळेत प्रवेश करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी या स्मारकास अभिवादन करावे, शहीदांच्या शौर्याची आठवण ठेवावी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा घ्यावी, ही या स्मारकामागील प्रमुख भावना आहे. स्मारकासमोर नतमस्तक होताना विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रध्वज, भारतीय सैनिक आणि मातृभूमी यांच्याविषयी आदर, अभिमान व कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

सैनिक शाळेमध्ये अशा स्मारकाचे विशेष महत्त्व आहे. सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिस्त, धैर्य, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि देशसेवा या मूल्यांचे शिक्षण दिले जाते. शहीद स्मारकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची प्रत्यक्ष जाणीव होईल. शहीदांचे जीवन, त्यांचे शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रासाठीचे समर्पण हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

हे स्मारक विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, कर्तव्यपरायणता आणि राष्ट्रनिष्ठा जागृत करणारे प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास प्राचार्य मेजर एस. पी. कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

## तालुका स्तरीय क्रिकेट स्पर्धेत केजच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा ऐतिहासिक विजय

केज :तीन वर्षे बंद असलेली केजची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा नव्या जोमाने उभी राहिली असून गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबरच आता या शाळेने केज तालुक्याच्या क्रीडा विश्वात ही आपला दबदबा निर्माण केला असून तालुका स्तरीय चौदा ते सतरा वर्षे वयोगटात या शाळेच्या क्रिकेट संघाने केज शहरातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व शारदा इंग्लिश स्कूल सारख्या नामवंत शाळेच्या संघाला धूळ चारत तालुका स्तरीय विजेतेपद पटकावले आहे. विशेष म्हणजे अंतिम सामन्यात एकही विकेट न गमावता शाळेने एकतर्फी विजय मिळवला.



आता या शाळेचा संघ बीड जिल्हास्तरीय विजेतेपदासाठी सामने खेळणार आहे.

तीन वर्षे बंद अवस्थेत राहिलेल्या या शाळेला स्थानिक नागरिक व माजी विद्यार्थी यांनी पुनर्जिवीत केले आहे. पहिल्याच वर्षी या शाळेचे विद्यार्थी अभ्यासासोबतच खेळ व इतर क्षेत्रात भरीव कामगिरी करत आहेत.

शाळेच्या या यशाबद्दल माजी विद्यार्थी संघांचे सुनील हुलसूरकर, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, शालेय समिती अध्यक्ष मोहन गुंड यांनी शाळेचे सर्व शिक्षक व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

विजेत्या संघातील सर्व खेळाडूंचा योग्य ती बक्षिसे देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती हनुमंत भोसले व भाई मोहन गुंड यांनी शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने दिली आहे. विजेत्या संघांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शाळेला भविष्यात कोणत्याही बाबींची कमतरता पडू दिली जाणार नाही असे आश्वासन ही शालेय समिती व माजी विद्यार्थी यांनी दिले आहे.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन-४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ❊ संपादक- अभिजीत जगताप ❊ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ❊ फोन-२४७२७०, मो :-९७६४०३३१११,९७६५५०००८८

## टी.सी. हरवला आहे

माझा किशोर प्रताप सोळंके स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड या महाविद्यालयाचा इयत्ता १२ वी पासचा ओरीनजल टी. सी. आमला ते सिरसाळा या प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.-८७६७७२६२२५

## दुष्काळी तालुक्यात....पान १ वरून

लावल्या आहेत. शासनाने अंबाजोगाई तालुका दुष्काळग्रस्त असल्याबाबत किंवा त्याला वगळण्यात आल्याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. शासन स्तरावरून अधिकृत दुष्काळ यादी किंवा आदेश प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सध्या प्रसारित होत असलेल्या याद्या पूर्णपणे अप्रमाणित व खोट्या असल्याचे प्रशासनाने अत्यंत परखड शब्दांत स्पष्ट केले आहे.

**प्रशासनाचे आवाहन आणि कारवाईचा इशारा**

नागरिकांनी आणि विशेषतः शेतकऱ्यांनी अशा कोणत्याही अप्रमाणित बातम्यांवर किंवा संदेशांवर अजिबात विश्वास ठेवू नये, असे ठाम आवाहन तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे. जोपर्यंत शासनाकडून अधिकृत निर्णय येत नाही, तोपर्यंत कोणतीही माहिती पुढे फॉरवर्ड करून समाजात संभ्रम वाढवू नये. दुष्काळाबाबतचा शासनाचा अधिकृत निर्णय प्राप्त झाल्यानंतर तो रीतसर प्रशासकीय माध्यमातून कळवला जाईल. त्यामुळे नागरिकांनी केवळ अधिकृत शासकीय माहितीलाच प्राधान्य द्यावे.

## केज व धारूर... पान ४ वरून

होऊ शकतो. पावसाअभावी हिरवा चारा उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.पशुपालकांना जनावरांच्या चाऱ्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. त्याचा परिणाम शेती व पशुपालनावर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागातील कुटुंबांच्या उत्पन्नावरही होत आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची गांभीर्याने दखल घ्यावी. केज व धारूर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा. शेतकरी, पशुपालक, ग्रामीण कुटुंबांना आवश्यक मदत व उपाययोजना उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली पाणी संवर्धन, उपलब्ध जलस्त्रोतांचा काटकसरीने व योग्य वापर, चारा व्यवस्थापन आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या उपजीविकेला आधार देण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील पाणी, शेती व पशुधनाशी संबंधित प्रश्नांवर स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा करण्याची गरज आहे.

## स्व.भगवानराव लोमटे...पान १ वरून

पी.एच.डी. प्राप्त झाली.

कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी, गावशिव, पंढरीच्या वाटेवर, काया मातीत मातीत, वैदर्भी, साय, वृषभसूक्त, मातीचा झरतो डोळा, मायबाप हे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. डेबू व डेबूजी प्रमुख कादंबऱ्या आहेत. चित्रपट गीत लेखन, पटकथा लेखन, अंधारयात्रा हे नाटक खूप गाजले होते. पहाडी आवाजात कविता सादर करणारे कवी म्हणून रसिकांना ते आवडतात.

त्यांचा जन्म हिंगणी ता. तेल्हारा जिल्हा अकोला येथे झाला. निवृत्ती नंतर सध्या ते पुण्यात वास्तव्य करतात. त्यांचा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात सुरुवाती पासून सहभाग राहिला आहे. भगवानराव लोमटे व त्यांची मैत्री सर्वश्रुत आहे. विठ्ठल वाघ यांनी महाराष्ट्रभर कवितेचे कार्यक्रम करून भाषा वृध्दी व प्रसाराचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन यावर्षीचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे आहे.

यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण, प्रा. भास्कर चंदनशिव, पद्मश्री डॉ. सतीश आळेकर व डॉ. वासुदेव मुलाटे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

या वर्षीचा चौदावा पुरस्कार कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृह, अंबाजोगाई येथे प्रख्यात साहित्यिक व गांधीवादी विचारवंत प्राचार्य डॉ . विश्वास पाटील, शहादा यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, बीड यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येईल. अशीही माहिती दगडू लोमटे यांनी दिली. या कार्यक्रमास सर्वां नागरिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन, समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा. सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतीश लोमटे, सदस्य सर्वश्री डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. भगवान शिंदे, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक पोखरकर आणि राजपाल लोमटे यांनी केले आहे.

## टी.सी. हरवला आहे

माझा मेघराज पांडुरंग देशमुख,रा.अंजनपुर ता. अंबाजोगाई जि.बीड या नावाचा इयत्ता १२ वी पासचा ओरीनजल टी.सी. अंबाजोगाई ते अंजनपुर या प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.-७३५०१००८००

## कानडीमाळी येथे ...पान १ वरून

शिवीगाळ का केली ? अशी विचारणा केली असता त्यास प्रथमेश उर्फ बॉबी खाडे याने तुला काय करायचे ? असे म्हणत शिवीगाळ करीत चापट मारली. त्यास सुमित याने पण चापट मारली. त्यां नतर १७ सप्टेंबर रोजी रात्री ८.१५ वाजता सुमित व आदित्य हे दोघे कानडी माळी येथे रस्त्यावर उभे असताना प्रथमेश खाडे, दया खाडे, रोहीत खाडे या तिघांनी येऊन सुमित यास धक्का-बुक्की करीत खाली पाडले. डोक्यात लोखंडी रॉड मारून सुमितचे डोके फोडले. आदित्य यास लाथाबुक्याने मारहाण करीत डोक्यात रॉडने मारून गंभीर दुखापत केली. लोखंडी रॉड व पाईपने पाठीवर व हातावर मारुन दुखापत केली. अशी तक्रार सुमित लोखंडे याने दिल्या वरून प्रथमेश खाडे, दया खाडे, रोहीत खाडे या तिघां विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक फौजदार प्रल्हाद चव्हाण हे तपास करीत आहेत.

## अंबाजोगाईत आज रिपब्लीकन ...पान ४ वरून

२० ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या समता क्रांती (मार्च) रॅलीत केंद्रीय मंत्री मा.ना.रामदासजी आठवले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या रॅलीच्या पूर्व तयारीसाठी अंबाजोगाई येथे येत्या रविवारी ही बैठक होत आहे. बैठकीतील विषय असे की, १) कसत असलेल्या गायरान धारकांना सरसकट सातबारा देण्यात यावा, २) महागाई प्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये वाढ करण्यात यावी, ३) ग्रामीण व शहरी भागात गावठाण मध्ये असणाऱ्या गोरगरीब लोकांना मालकी हक्काचा पीटीआर देण्यात यावा, आणि ४) अनुसूचित जाती जमाती उपवर्गीकरण विरोधी समता क्रांती मार्च रॅली यासंदर्भात पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी या बैठकीस रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट) पक्षाचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, प्रमुख नेते व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रमोद दासुद, दशरथ सोनवणे, मनोज इंगळे, दिपक कांबळे, राणीताई गायकवाड, किरण खंडागळे, राहुल गंडले, भाऊ कारडे, विकास सुरवसे, सुरेश कांबळे, अनिल सावंत, दयानंद लांडगे, मधुकर कसबे, गणेश टेकाळे यांनी केले आहे.

## रोटरी क्लब ऑफ... पान १ वरून

याकामी तौर हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमनाथ बोरगाव आणि रोटरी या दोहोंच्या मधील दुवा ठरले. तौर यांच्या पाठपुराव्याला रोटरी क्लब ऑफ मनोहर आंबेजोगाईने सकारात्मक प्रतिसाद दिला. आणि त्यानंतर हा प्रेरक उपक्रम यशस्वी झाला. यासोबतच शाळेतील विद्यार्थी आणि ग्रामस्थांची मिळून १२० जणांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी मध्ये मोतीबिंदू आढळलेल्या रूग्णांचे ऑपरेशन पूर्णतः मोफत करण्यात येणार असून, त्याचा संपूर्ण खर्च रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष रो.भीमाशंकर शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देतानाच शाळेतील स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांनी कौतुक केले. रोटरी क्लबच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा आणि ग्रामस्थांना आरोग्यसेवेचा लाभ मिळाला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.भीमाशंकर शिंदे, सचिव रो.सुनील व्यवहारे, रो.जगदीश जाजू, रो.वाजेद काझी, रो.शरद देडे यांच्यासह उपसरपंच संजय येडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश डोंगरे, उपाध्यक्ष अरूण इके, माजी अध्यक्ष उमेश टोणगे, सदस्य रमेश कांबळे, पांडुरंग वाघमारे, योगेश सांगेकर, एकनाथ वाघमारे, कमलाकर जोगदंड, महादेव येडे, आश्रुबा सावंत, भगवान सोमवंशी, बंकट सोमवंशी, ठोंबरे साहेब, बिभीषण सोमवंशी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्रीनिवास मोरे होते. प्रास्ताविकात अध्यक्ष रो.भीमाशंकर शिंदे यांनी रोटरी क्लबच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन शिक्षक गणेश तौर यांनी केले, तर आभार सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांनी पुढाकार घेतला.

## केज मतदार संघात.... पान १ वरून

मंडळाच्या मुख्य शहरात किंवा गावात पाऊस पडल्यास, त्या केंद्राच्या आधारे संपूर्ण मंडळातील १५ ते २० गावांतही पाऊस झाल्याचे शासकीय नोंदींवर गृहीत धरले जाते. प्रत्यक्षात लगतच्या खेड्यांमध्ये पावसाचा थेंबही नसताना केवळ मंडळ केंद्राच्या आकडेवारीमुळे गावे दुष्काळी मदत आणि पीक विम्याच्या संरक्षणापासून वंचित राहण्याचा धोका वाढला आहे.

प्रत्यक्ष परिस्थिती आणि शासकीय आकडेवारी यातील तफावत दूर करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावी, जेणेकरून पारदर्शक माहितीच्या आधारे बळीराजाला योग्य मदत मिळू शकेल, अशी प्रशासनाकडे मागणी करण्यात आली आहे.

## परळीत संतश्री गुरुलिंग.... पान ४ वरून

दिनांक २२ सप्टेंबर रोजी श्री सद्गुरू १०८ सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या आशीर्वाचनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभात श्री संतश्री गुरुलिंग स्वामी व सद्गुरु श्री १०८ सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमांचे विधीवत पूजन दैनिक महाराष्ट्र टाइम्स छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे उपसंपादक श्री व सौ आशिष शंकरअप्पा चौधरी तसेच परळी न्यायालयातील वरिष्ठ लिपिक श्री व सौ अविनाश शंकरअप्पा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी झाली असून, प्रत्येक वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा अखंड शिवनाम सप्ताह, पालखी सोहळा, भंडारा अशा पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम २२ सप्टेंबरपर्यंत आयोजित केले जातील. श्री सद्गुरू १०८ सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या उपस्थितीत दत्ताप्पा ईटके गुरूजी व समस्त विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षतेखाली हा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात होत आहे.

सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ८ वाजता शिव सहस्त्रनामावली, सकाळी ९ ते ११ वाजता परम रहस्य व श्री पलसिद्ध महात्म्याचे पारायण, सकाळी १०.३० ते १२ वाजता श्री मन्मथ स्वामी गाथावरील सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ८ वाजता शिव सहस्त्रनामावली, सकाळी ९ ते ११ वाजता परम रहस्य व श्री पलसिद्ध महात्म्याचे पारायण, सकाळी १०.३० ते १२ वाजता श्री मन्मथ स्वामी गाथावरील भजन, दुपारी ३ ते ५ वाजता शिव पाठ आरती व सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. परम रहस्याचे पारायण प्रमुख शि.भ.प. श्री दयानंद अण्णा चौधरी हे करीत आहेत.

## आज अंबाजोगाईत अलखैर...पान ४ वरून

या वार्षिक सर्वसाधारण सभेत पतसंस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा आढावा, आर्थिक व्यवहार, सभासदांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, संस्थेची प्रगती तसेच आगामी काळातील नियोजन याबाबत चर्चा होणार आहे. सभासदांच्या सूचना, प्रश्न आणि संस्थेच्या भविष्यातील वाटचालीच्या दृष्टीनेही ही सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सर्वसामान्यांच्या आर्थिक विकासासाठी कार्यरत

अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेने गेल्या काही वर्षांत सर्वसामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या गरजू घटकांना आर्थिक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याच्या उद्देशाने कामकेले आहे. आर्थिक गरजांच्या वेळी सभासदांना विविध प्रकारच्या कर्जसुविधा उपलब्ध करून देणे, बचतीला प्रोत्साहन देणे आणि सभासदांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन सेवा देण्यावर संस्थेने भर दिला आहे.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आधार देत त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करण्याची भूमिका संस्थेने स्वीकारली आहे. त्यामुळे केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था न राहता सभासद व सर्वसामान्यांच्या आर्थिक विकासात योगदान देणारी सहकारी संस्था म्हणून अलखैर पतसंस्थेची ओळख निर्माण झाली आहे.

पतसंस्थेच्या वाटचालीत सभासदांचा सहभाग महत्त्वाचा मानला जातो. त्यादृष्टीने वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेण्याची तसेच भविष्यातील नियोजनाबाबत चर्चा करण्याची महत्त्वाची संधी असते. त्यामुळे अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांनी या सभेला उपस्थित राहून संस्थेच्या कामकाजाबाबत माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन पतसंस्थेचे उपाध्यक्ष खतीब मोहम्मद मुजम्मील, सचिव शेख रिजवान, व्यवस्थापक सय्यद रऊफ यांच्यासह सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. पतसंस्थेचे सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक व स्नेहिजन यांनी रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी डॉ . ए.पी.जे. सभागृह येथे होणाऱ्या २२ व्या सर्वसाधारण सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पोलिसांच्या पुढाकाराने ... पान ४ वरून

भेगांमुळे दुचाकीस्वारांसह अनेक वाहनधारकांना अपघातांना सामोरे जावे लागले आहे. काही जण जखमी झाले आहेत. यावर दिंद्रुड पोलिसांनी पुढाकार घेत रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

सर्वसामान्यांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. तरीही संबंधित यंत्रणेकडून अपेक्षित कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे दिंद्रुड पोलिसांनी पुढाकार घेतला. पोलिसांनी एमएसआरडीसी आणि एनएचएल कंपनीच्या कंत्राटदारांशी संपर्क साधला. गुरुवारपासून धोकादायक भेगा बुजवण्याचे काम सुरू केले आहे. दिंद्रुड पोलिस ठाण्याचे सपोनि महेश भोसले यांनी कंपनीकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. सर्वसामान्यांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत वारंवार तक्रारी केल्या आहेत. तरीही संबंधित यंत्रणेकडून अपेक्षित कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे दिंद्रुड पोलिसांनी पुढाकार घेतला. पोलिसांनी एमएसआरडीसी आणि एनएचएल कंपनीच्या कंत्राटदारांशी संपर्क साधला. गुरुवारपासून धोकादायक भेगा बुजवण्याचे काम सुरू केले आहे. दिंद्रुड पोलिस ठाण्याचे सपोनि महेश भोसले यांनी कंपनीकडे वारंवात कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे दिंद्रुड पोलिसांनी पुढाकार घेतला. पोलिसांनी एमएसआरडीसी आणि एनएचएल कंपनीच्या कंत्राटदारांशी संपर्क साधला. गुरुवारपासून धोकादायक भेगा बुजवण्याचे काम सुरु केले आहे. दिंद्रुड पोलिस ठाण्याचे सपोनि महेश भोसले यांनी कंपनीकडे वारंवर पाठपुरावा केला आहे. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून रस्त्यावरील भेगा बुजवून घेतल्या आहेत. या कार्यवाहीमुळे वाहनधारकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पालखी महामार्गावरील रस्त्याची नियमित देखभाल करावी. उर्वरित भेगाही बुजवाव्यात, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

अपघाताला आळा बसेल पोलिसांचे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे मुख्य काम आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून दिंद्रुड पोलिस हद्दीतून जाणाऱ्या पालखी महामार्गावरील मोठमोठ्या भेगा अपघाताच्या कारण ठरत होत्या, आम्ही माणुसकीच्या जाणिवेतून आणि पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनातून या भेगा बुजविण्यासाठी काम करत आहोत, यामुळे अपघाताला निश्चितच आळा बसेल अशी अपेक्षा आहे. - महेश भोसले, सहायक पोलिस निरीक्षक

## ज्ञानदानाचा निस्सीम... पान ४ वरून

वर्षे सेवा केली आहे व सध्या अंबाजोगाई येथील कै. देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नूतन प्राथमिक विद्यालयात कार्यरत असलेल्या अंजली मॅडम यांनी आपल्या अविरत परिश्रमांतून शेकडो विद्यार्थ्यांचे आयुष्य प्रकाशमान केले आहे. त्यांच्या याच उत्तुंग आणि समर्पित शैक्षणिक व सामाजिक कार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेत 'मराठवाडा साहित्य परिषद, शाखा परळी वैजनाथ' यांच्या वतीने त्यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२६' देऊन गौरविण्यात आले आहे. हा सन्मान त्यांच्या अखंड ज्ञानयज्ञाचा यथोचित गौरव आहे.

प्राथमिक शिक्षण हा मानवी जीवनाचा सर्वात महत्त्वाचा पाया असतो. अंजली मॅडम यांनी इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी सारख्या मूलभूत विषयांचे धडे देताना, त्यांच्यात पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची भक्कम पायाभरणी केली आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाची गोडी कशी निर्माण करावी, याचे एक उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे. त्यांच्या अध्यापन पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शिक्षणात आणलेली आधुनिकता आणि सर्जनशीलता होय. 'वाचन कट्टा', 'शैक्षणिक खेळ' आणि संगीत यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी बालमनाला आनंदी ठेवत शिक्षण प्रक्रियेत सामावून घेतले आहे. यामुळे खेळत-हसत शिकण्याची मुलांची प्रवृत्ती वाढीस लागली.

अंजली कुलकर्णी मॅडम या केवळ एक आदर्श शिक्षिका नसून एक संवेदनशील आणि सामाजिक भान जपणार्या सुजाण नागरिक आहेत. अनेकदा गरिबीमुळे हुशार विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागते. हीच अडचण ओळखून त्यांनी अनेक गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी स्वतःहून आर्थिक सहाय्य केले आहे. तसेच अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या जिल्हाध्यक्षा च्या माध्यामातून अनेकाना मदतीचा हात दिला आहे . वधु वर मेळावे घेऊन अनेकांचे संसार त्यानी या माध्यामातून उभे केले आहेत.

विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची ही वृत्ती त्यांचे सामाजिक दायित्व अधोरेखित करते.

एक उत्तम शिक्षक तोच असतो जो स्वतः सतत शिकत राहतो. अंजली मॅडम यांची साहित्यनिष्ठा आणि स्वतःला ज्ञानसमृद्ध ठेवण्याची वृत्ती वाखाणण्याजोगी आहे. वाचनाची हीच आवड त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्येही रुजवली. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या धनी असलेल्या अंजली मॅडमला मिळालेला हा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' त्यांच्या त्यागाची, निष्ठेची आणि कष्टाची पावती आहे. त्यांचा हा ज्ञानदानाचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा प्रवास असाच अविरत आणि दिमाखात सुरू राहो, हीच या निमित्ताने त्यांना सदिच्छा!

# दैनिक विवेक सिंधु

रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ पान ४


## परळीत संतश्री गुरुलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सवास भाविकांची लक्षणीय उपस्थिती

परळी –वीरशैव समाज परळीच्या वतीने संतश्री गुरुलिंग स्वामी यांचा १२५ वा पुण्यतिथी महोत्सव आणि अखंड शिवनाम सप्ताह मंगळवार दिनांक १५ सप्टेंबर पासून भाविक भक्तांच्या मोठ्या उपस्थितीत उत्साहात सुरु झाला आहे. मंगळवार

पान ३ वर

## ज्ञानदानाचा निस्सीम यज्ञ गाजवणार्या आदर्श शिक्षिका: श्रीमती अंजली कुलकर्णी

बीड–शिक्षण ही केवळ एक नोकरी नसून ते समाज घडवण्याचे एक पवित्र व्रत आहे, याचा प्रत्यय श्रीमती अंजली रेणुका वसंतराव कुलकर्णी यांच्या २२ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्ठावंत सेवाकाळाकडे पाहताना येतो.परळी येथील भगवान प्राथमिक विद्यालयात त्यांनी २२

पान ३ वर

# टिप्पर, बोलेरोचा भिषण अपघात

बीड – भरधाव बोलेरो जीप आणि टिप्परची समोरा समोर भिषण धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींपैकी एका महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. हा अपघात आज सकाळी बीड शहराजवळील महालक्ष्मी चौक ते छत्रपती संभाजीराजे चौक बायपास रोडवर घडला. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

बीड शहराजवळुन जाणाऱ्या बायपासवर आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास टिप्पर आणि बोलेरोची समोरा समोर धडक झाली. या अपघातात शिवकन्या बडे, नंदा बडे, राणी बडे, अभिषेक बडे आणि गायत्री कचरे हे पाच जण जखमी झाले आहेत. या जखमींपैकी नंदा बडे यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.बडे कुटुंब हे पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथील रहिवाशी असुन ते बोलेरो गाडीमधुन अक्कलकोटच्या दिशेने जात होते. बीड बायपास रोडवरी पांगरबावडी ब्रिजजवळ टिप्परने अचानक वळण घेतल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईची सामाजिक बांधिलकी

### शाळेला ५ सायकली, हॅण्डवॉश स्टेशन व कंपोस्ट ड्रम भेट ; १२० जणांची मोफत नेत्र तपासणी





अंबाजोगाई (प्रतिनिधी)– सामाजिक बांधिलकी जपत रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमनाथ बोरगाव येथे गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर रोजी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.

दूरवरच्या वस्तीवरुन व शेतातून शाळेत येणाऱ्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रवासाची सोय व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमनाथ बोरगाव यांना ५ सायकली भेट देण्यात आल्या. सदरील सायकली या विद्यार्थ्यांनाच कायमस्वरूपी दिल्या नसून त्या शाळेसाठी देण्यात आल्या आहेत. आपण तर वापराच परंतु, आपण उत्तीर्ण होवून शाळा सोडून जाण्यापुर्वी या सायकली पुढील गरजू विद्यार्थ्यांना हस्तांतरित करा असा हा स्तुत्य उपक्रम आहे. ज्याचा फायदा गरजू विद्यार्थ्यांना होईल. तसेच याच शाळेला हॅण्डवॉश स्टेशन व कंपोस्ट खत निर्मितीचा ड्रम ही भेट देण्यात आला. रोटरीकडून या शाळेचीच निवड का करण्यात आली. तर सदरील शाळेतील समाज स्नेही व उपक्रमशील शिक्षक गणेश तौर यांनी या विषयाच्या अनुषंगाने रोटरीकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

पान ३ वर

# सानप वस्तीच्या छत कोसळून जमीनदोस्त झालेल्या शाळेला अधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांच्या भेटी



केज :– केज तालुक्यातील सानप वस्तीच्या छत कोसळू जमीनदोस्त झालेल्या शाळेला आता अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या भेटींची रीघ लागली आहे.

दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या अगदी हलक्या पावसाने केज तालुक्यातील लव्हुरी केंद्रातील घटक शाळा असलेल्या तरनळी येथील सानप वस्तीवरची षटकोनी आकारातील शाळेची इमारत अगदी पत्त्याच्या बंगल्या प्रमाणे कोसळून जमीनदोस्त झाली होती. मात्र हा प्रकार मध्यरात्री शाळा बंद असताना घडल्याने सुदैवाने अनर्थ टळला होता.

दि. १९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे, सर्वशिक्षा अभियानचे शाखा अभियंता तेरखेडकर, डेटा ऑपरेटर स्वामी आणि केंद्रप्रमुख यांनी शाळेला भेट देऊन सर्व माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली.

नंदकिशोर मुंदडा आणि भाई मोहन गुंड यांचीही भेट :– सानप वस्तीच्या जमीनदोस्त झालेल्या शाळेला भाजपच्या आमदार आणि अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा आणि शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी भेट दिली.

## अंबाजोगाईत आज रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट) पक्षाच्या बैठकीचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– अंबाजोगाईत रविवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरातील हॉटेल कृष्णाई मिटींग हॉल या ठिकाणी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट) पक्षाच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी या बैठकीस रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट) पक्षाचे सर्व आजी–माजी पदाधिकारी, प्रमुख नेते व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष प्रमोद दासुद यांनी केले आहे.

रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले गट) तालुकाध्यक्ष प्रमोद दासुद यांनी आवाहन केले आहे की, रि.पा.इं (आठवले गट) वतीने समता क्रांती (मार्च) रॅली दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी बीड शहरात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना.रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात येणार आहे. त्याच्या पूर्व तयारीसाठी अंबाजोगाईत रविवार, दिनांक २० सप्टेंबर रोजी एका महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन दुपारी साडेबारा वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरातील हॉटेल कृष्णाई मिटींग हॉल या ठिकाणी करण्यात आले आहे. यावेळी बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून पप्पूजी कागदे (युवक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बीड येथील

पान ३ वर

## आज अंबाजोगाईत अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेची २२ वी सर्वसाधारण सभा

### सभासद, ग्राहक व हितचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

अंबाजोगाई – अंबाजोगाई येथील अल्खैर नागरी सहकारी पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम सभागृह, आरिष कॉलनी, मंडीबाजार, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आली आहे. पतसंस्थेचे चेअरमन शेख उमर फारुख यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. या सभेस प्रमुख अतिथी म्हणून जमात–ए–इस्लामी हिंदच्या केंद्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य तथा नवी दिल्ली येथील वेलफेअर पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मुजतबा फारुक, अंबाजोगाईचे माजी उपनगराध्यक्ष शेख रहीमभाई, राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाचे उपाध्यक्ष व संचालक तथा अंबाजोगाई पीपल्स को–ऑप. बँकेचे संचालक ड. विष्णुपंत सोळंके, केज नगरपंचायतीचे गटनेते हारुनभाऊ इनामदार, ज्येष्ठ पत्रकार दिलीपराव आरसूळ, जमियत ऊल अरबचे महाराष्ट्र अध्यक्ष नासेर बिन मोहम्मद अल नाहदी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पान ३ वर

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नेकनूर पोलिसांचा रूट मार्च

### लिंबागणेश, चौसाळा व नेकनूरमध्ये पोलिसांचे संचलन



नेकनूर – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने नेकनूर पोलिसांकडून लिंबागणेश, चौसाळा आणि नेकनूर येथे १८ सप्टेंबर रोजी रूट मार्च काढण्यात आला.

या रूट मार्चमध्ये ४ पोलीस अधिकारी, १० पोलीस अंमलदार आणि १५ होमगार्ड, असे एकूण २९ अधिकारी–अंमलदार सहभागी झाले होते. प्रमुख चौक, बाजारपेठा, गणेश मंडळांचे परिसर, गर्दीची ठिकाणे तसेच महत्त्वाचे मार्ग येथे हा रूट मार्च काढण्यात आला. गणेशोत्सव शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा. यासाठी गणेश मंडळांनी ध्वनीविषयक नियमांचे पालन करावे. वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. वादविवाद अथवा अनुचित प्रकार टाळावेत. अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या. दरम्यान, उत्सव काळात नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग, नाकाबंदी, गर्दी व वाहतूक व्यवस्थापन तसेच महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे. असे आवाहन नेकनूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# केज व धारूर तालुक्यांत जलस्रोत आटले

## चाऱ्याचा प्रश्न गंभीर, पशुपालकांवर संकट



केज– यंदा अल्प पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून विहिरी, तलावात पाणीसाठा शिल्लक राहिलेला नाही. जनावरांना चारा नसल्याने शेतकरी व पशुपालकांवर संकट ओढवले आहे. येथील युवाग्राम विकास मंडळ या सामाजिक संस्थेने केज व धारूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर परिस्थितीचा विचार करून दुष्काळ जाहीर करावा. उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी युवाग्राम संस्थेने केली आहे.

पावसाअभावी निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी युवाग्राम विकास मंडळाचे कार्यकारी सचिव एच. पी. देशमुख यांनी केज व धारूर तालुक्यातील विविध तलावांना भेट देऊन पाणीसाठ्याची प्रत्यक्ष पाहणी केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाची स्थिती, पिकांवरील परिणाम, शेतीची परिस्थिती, जनावरांसाठी उपलब्ध चारा, पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत माहिती घेतली.

पावसाचे प्रमाण कमी असल्याने पिकांना आवश्यक पाणी मिळत नाही. त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. शेतीचा खर्चही वाढत आहे. तलाव व इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा आणखी कमी झाल्यास सिंचनाबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर

पान ३ वर

## पोलिसांच्या पुढाकाराने तेलगाव मार्गावरील धोकादायक भेगा बुजवल्या



दिंद्रुड – मेहकर–पंढरपूर पालखी महामार्गावरील टालेवाडी फाटा ते तेलगावदरम्यान दिंद्रुड पोलिस हद्दीतील रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे वाहनधारकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या

पान ३ वर